सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**LOKNETE SHAMRAO PEJE**
**GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING,RATNAGIRI**
**(Affiliated to Dr. BabasahebAmbedkar Technological University, Lonere, Dist. Raigad)**
Government Polytechnic Campus, Near Thibaw Palace, Ratnagiri-415612.(Maha.) Email :
office.gcoeratnagiri@dtemaharashtra.gov.in / principal.gcoeratnagiri@dtemaharashtra.gov.in
**Contact No. 8793284358 Website : gcoer.ac.in**

**▪Year of Establishment : 2021 ▪AICTE Permanent ID : 1-9442079401 ▪DTE Code : 3042**

जा.क्र.लोशापेशाअमर/विवि/वि.सुचना/२०२६-२७/1327 दि.१७/०७/२०२६

**विषय : प्रथम वर्षानंतर अभ्यासक्रम (शाखा) बदलणे / प्रथम, द्वितीय किंवा तृतीय वर्षा नंतर संस्थेचे स्थानांतरण (संस्था बदल) ची कार्यवाही करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आल्या बाबत.**

संदर्भ : १. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच परिपत्रक जा.क्र २/ एनजीसी / वि.सं.ब. /२०२६/५०४ आणि ५०५दिनांक: ०८/०७/२०२६
२. मा. सहसंचालक, वि. का. मुंबई याच्या कार्यालयाचा दि. ०८/०७/२०२६रोजीचा ई-मेल.
३. जा.क्र.लोशापेशाअमर/ प्रवेश- वि.सं.ब. /शा.बदल/२०२६/१२९४-१२९५दि. १०/०७/२०२६
४. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच परिपत्रक जा.क्र.२/ एनजीसी/वि.सं.ब./२०२६/ ५४३ दिनांक: १५/०७/२०२६

## विद्यार्थ्यांना सूचना.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की संदर्भीय क्र. १ ते ३ च्या परिपत्रकान्वये दिनांक १५/०७/२०२६ या कालमर्यादे पर्यंत प्रथम वर्षानंतर अभ्यासक्रम (शाखा) बदलणे / प्रथम, द्वितीय किंवा तृतीय वर्षानंतर संस्थेचे स्थानांतरण बाबत कार्यवाही करण्याच्या जाहीर केलेल्या दिनांकाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्यासाठी संदर्भ क्र.४ अन्वये **दिनांक २०/०७/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे**. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. एस. जी. आकोजवार)
प्राचार्य
लोकनेते शामराव पेजे
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी

Government College of Engineering · Loknete Shamrao Peje · Ratnagiri

प्रत -
१. विद्यार्थी सूचनाफलक, लोशापेशाअम, रत्नागिरी. (नवीन इमारत/ जुनी इमारत)
② website, LSP GCOE Ratnagiri

जा. क्र/लोशापेशाअमर/वि.वि/2026/1332 दि:- 17 JUL 2026

# विदयार्थ्यांना सुचना.

## विषय: विविध शासकीय व शैक्षणिक कागदपत्रे/प्रमाणपत्रे मिळण्या बाबत अर्ज करण्याविषयी.

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना या संस्थेतून कोणतीही कागदपत्रे जसे की **बोनाफाइड प्रमाणपत्र** (Bonafide Certificate), **ट्रान्सफर सर्टिफिकेट** (Leaving Certificate / LC), **किंवा इतर कोणतेही प्रमाणपत्र** हवे असल्यास, त्यांनी **कमीत कमी ७ दिवस आधी** महाविद्यालयाच्या कार्यालयात रीतसर अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

अर्जासोबत आवश्यक ती सर्व विहित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यापासून ७ प्रशासकीय कामकाजाच्या दिवसांच्या (Working Days) आत संबंधित कागदपत्रे देण्याचा महाविद्यालयाकडून पूर्ण प्रयत्न केला जाईल. ऐनवेळी केलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही करणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**विशेषत: ट्रान्सफर सर्टिफिकेट (LC) साठी आवश्यक कागदपत्रे:**
विद्यार्थ्यांनी एल.सी. चा अर्ज करताना खालील कागदपत्रे क्रमाने जोडणे अनिवार्य आहे:

- विद्यार्थी व पालकांची स्वाक्षरी असलेला मूळ अर्ज.
- ना देय प्रमाणपत्र
- मुळ ओळखपत्र (कॉलेजचे आयडी कार्ड जमा करणे)
- कॅप आयडी सर्टिफिकेट (CAP ID Certificate).
- सर्व वर्षांच्या फी भरल्याच्या मूळ पावत्या/छायांकित प्रती.
- सर्व वर्षांच्या/सत्रांच्या गुणपत्रिका (Marksheets).
- आधार कार्ड छायांकित प्रत.
- बँक पासबुकच्या पहिल्या पानावरील छायांकित प्रत.
- दोन अद्ययावत पासपोर्ट साईझ फोटो.

**टीप:** अपूर्ण कागदपत्रे असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक गैरसोय टाळण्यासाठी वेळेत अर्ज सादर करावेत.

Government College of Engineering, Ratnagiri Lokneta Shamrao Peje

(डॉ. एस. जी. आकोजवार)
प्राचार्य
लोकनेते शामराव पेजे
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी

प्रत -
१. विद्यार्थी सूचनाफलक, लोशापेशाअम, रत्नागिरी. (नवीन इमारत/ जुनी इमारत)
२. Website, LSP GCOE Ratnagiri

जा. क्र./लो. शा. पे. शा. अ. म. र/ वि.वि./2026/~~333~~ 1331 दि:- 17 JUL 2026

# विद्यार्थ्यांना सुचना

संदर्भ: अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी (फी सवलत व शिष्यवृत्ती थकबाकीबाबत)

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना या सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, प्रवेशाच्या ३ किंवा ४ वर्षांच्या कालावधीत ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्कामध्ये (Tuition Fee) सवलत घेतलेली आहे, त्यांनी खालील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे:

१. शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क जमा करण्याबाबत:

अर्ज न भरलेले विद्यार्थी: ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या काळात फी सवलत घेतली आहे, परंतु महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरलेला नाही, त्यांनी संस्थेची देय रक्कम त्वरित जमा करावी.

अर्ज मंजूर झालेले विद्यार्थी: ज्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज मंजूर झाले आहेत आणि महाडीबीटीकडून संस्थेला देय असलेली उर्वरित शिक्षण शुल्क/शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झाली आहे (किंवा होणार आहे), त्यांनी सदर रक्कम तात्काळ महाविद्यालयात जमा करावी.

SC प्रवर्गातील विद्यार्थी: अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी Government of India Post-Matric Scholarship चा अर्ज भरला आहे, त्यांना केंद्र सरकारकडून दुसऱ्या हप्त्याची ६०% रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते. अशा विद्यार्थ्यांनी ही उर्वरित संस्थेला देय असलेली रक्कम लवकरात लवकर महाविद्यालयात जमा करावी.

अर्ज नामंजूर (Reject) झालेले विद्यार्थी: महाडीबीटी पोर्टलवर ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज काही कारणास्तव नामंजूर/रिजेक्ट झाले आहेत, त्यांनी संपूर्ण उर्वरित शैक्षणिक शुल्क संस्थेत जमा करणे बंधनकारक आहे.

२. थकबाकी व प्रमाणपत्रे (No Dues):

जोपर्यंत विद्यार्थी महाविद्यालयाचे संपूर्ण शिक्षण शुल्क, शिष्यवृत्तीची उर्वरित रक्कम, ग्रंथालयाची पुस्तके (Library Books) किंवा इतर कोणत्याही विभागाची थकबाकी पूर्णपणे जमा करत नाहीत, तोपर्यंत त्यांना महाविद्यालयातून बोनाफाइड प्रमाणपत्र (Bonafide Certificate), ट्रान्सफर सर्टिफिकेट (Leaving Certificate - LC) किंवा इतर कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३. प्रलंबित अर्जांबाबत (हमीपत्र):

ज्या विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरलेले आहेत, परंतु त्यांची संस्थेला देय रक्कम महाडीबीटी पोर्टलवर प्रलंबित (Pending) दिसत आहे किंवा अर्ज अद्याप मंजूर झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना ट्रान्सफर सर्टिफिकेट (LC) घेताना विद्यार्थी व पालकांची स्वाक्षरी असलेले 'हमीपत्र' (Undertaking) सादर करावे लागेल.

Lokneta Shamrao Peje Government College of Engineering, Ratnagiri

(डॉ. एस. जी. आकोजवार)
प्राचार्य
लोकनेते शामराव पेजे
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी

प्रत -

१. विद्यार्थी सूचनाफलक, लोशापेशाअम, रत्नागिरी. (नवीन इमारत/ जुनी इमारत)

2) Website, LSP GCOE Ratnagiri